# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

जा.क्र.भिनिशमनपा/आयुक्त कार्या/ 02 /२०२०.
दिनांक :- २६/०३/२०२०.

अत्यंत तातडीचे / महत्वाचे.

प्रति,

श्री./श्रीम.--------------------------

व्यवस्थापक--------------------------

------------------------------------

भिवंडी.

विषय:- जगभरात पसरलेल्या कोरोना विषाणू रोगाच्या प्रसार टाळण्यासाठी भिवंडी नि.शहर महानगरपालिका स्तरावर करावयाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना.
बँक व ATM या ठिकाणी सामासिक अंतर (Social Distance) ठेवणेबाबत.

वाचा:- १. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन अधिसुचना क्र.करोना २०२०-प्र.क्र.५८/आरोग्य-५ दि.१४ मार्च २०२०.
२. महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन परिपत्रक क्रमांकः- एमआयएस-०९१९/प्र.क्र.२२६/विशा-४ दि.१६/०३/२०२०.

सध्या जगभरात पसरलेल्या करोना विषाणूची लागण राज्यातील काही भागात झाली आहे. सदर रोगाच्या प्रसार टाळण्यासाठी शासनाने राज्यभर अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू केल्या आहेत. त्यादृष्टीने राज्य शासनाने करोना विषाणूचा (COVID-19) प्रार्दुभाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दि.१३/०३/२०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतूदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

वरील अधिनियम व नियमानुसार साथरोग अधिनियमाच्या खंड २ (१) नुसार महानगरपालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी घोषित करुन त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी ते सक्षम असतील असे घोषित करण्यात आले आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१९ नुसार कोणत्याही दुर्धर रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास आयुक्तास, खास उपाययोजना करता येतील. त्यानुसार शहरातील सर्व **बँक व त्यांचे ATM** बाबत खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

बँक व ATM यांचे नियोजन :-

१. सर्व बँकांनी आपल्या बँकांच्या व ATM च्या दर्शनी भागावर क्रमाक व व्हॉट्स ॲप क्रमाक ठळक जागी लावावेत.
२. सर्व बँकानी प्रत्येक ग्राहक किमान ४ फुटांचे सामासिक अंतर (Social Distance) ठेवुन बँक व ATM मध्ये व बाहेर मार्किंग करावी.
३. बँक व ATM येथे कार्यरत असलेल्या कर्मचा-यांनी स्वतः हॅन्डग्लोज व मास्क वापरावेत.
४. प्रत्येक बँक व ATM मध्ये प्रवेश करताना बँकेमार्फत सॅनिटायझर उपलब्ध ठेवावे. रांगेतील प्रयेक व्यक्तीस हातावर सॅनिटायझर टाकल्यानंतर बँकेत अथवा ATM येथे येण्यासाठी परवानगी द्यावी.
५. ज्या बँक व ATM मध्ये जास्त गर्दी होते अशा बँकांनी बँकाबाहेर गर्दी नियंत्रणासाठी स्वतःचे पुरेसे कर्मचारी नियुक्त करावे.

वरील प्रमाणे नियोजनानुसार बँकांनी कामाचे तास व बँक बंद अथवा चालू ठेवण्याची वेळ

(कृ.मा.प.)

बाबत नियोजन करावे. तसेच आपत्कालीन परिस्थिती असल्यामुळे उलटपक्षी त्यांनी जास्तीत जास्त वेळ बँक व ATM उघडया ठेवून नागरिकांना सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात.

वरिल आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्याची सर्व जबाबदारी संबंधित बँक व्यवस्थापक/ कार्यालय प्रमुख यांची राहील.

(डॉ.प्रविण आष्टीकर)
आयुक्त
भिवंडी नि.शहर महानगरपालिका.

प्रत: माहीतीरस्तव व आवश्यक कार्यवाहीरस्तव.

१. जनसंपर्क व माहिती अधिकारी.
२. विभाग प्रमुख (संगणक).
३. मुख्य लेखा व वित्त अधिकारी.

प्रत: माहीतीरस्तव.

१. मा.पोलिस उप-आयुक्त (परिमंडळ -२), भिवंडी.
२. उप-आयुक्त (मु).
३. मुख्य लेखा परिक्षक.
४. प्र.सहा.आयुक्त (प्रशासन).
५. मुख्य लेखा परिक्षक.
६. पोलिस सहा.आयुक्त (पुर्व).
७. पोलिस उप-आयुक्त (पश्चिम).
८. वरिष्ठ पोलिस निरिक्षक, निजामपूरा.
९. वरिष्ठ पोलिस निरिक्षक, शांतीनगर.
१०. वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नारपोली.
११. वरिष्ठ पोलिस निरिक्षक, भोईवाडा.
१२. वरिष्ठ पोलिस निरिक्षक, भिवंडी शहर (कुंभारवाडा).

प्रत: माहितीरस्तव .

मा.महापौर.